आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवार दिनांक २१ डिसेंबर २०२४

ठळक बातम्या

1. नागपूर दिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले; पुढील अधिवेशन ३ मार्चपासून मुंबईत होणार.
2. महाराष्ट्र कारागृह सुधार सेवा-२०२४ हे विधेयक विधान परिषदेत एकमताने संमत.
3. विदर्भाच्या अपेक्षेला या अधिवेशनात काय न्याय मिळाला असा विधानसभेत विरोधी पक्षांचा अंतिम आठवडा प्रस्तावात सवाल.
4. भारतातील पहिल्या बायो बिटूमिन पासून तयार केलेल्या राष्ट्रीय महामार्गाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपूर मनसर मार्गावर उद्घाटन.

---

अंतिम आठवडा प्रस्ताव-मुख्यमंत्री उत्तर

नागपुरात १६ डिसेंबरपासून सुरू झालेल्या, हिवाळी अधिवेशनाचं सुप आज वाजलं. त्यापूर्वी अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, विदर्भ आणि मराठवाड्यात सर्वांगीण प्रगतीसाठी अनेकविध प्रकल्प राबविण्यात येत असून, त्यातून या दोन्ही भागातील मागास आणि दुष्काळी भागात विकास केला जात आहे अशी माहिती दिली. विदर्भात वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा, नदीजोड प्रकल्पाला मंजुरी देऊन, त्यातून ६१ टी.एम.सी. पाणी उचलून, दहा लाख हेक्टर, दुष्काळी भागात असलेली जमीन, ओलिताखाली आणली जात आहे. यातून ५५० किलोमीटर लांबीची, एक नवी नदी तयार होत आहे. बळीराजा योजनेतून, मराठवाडा, विदर्भमधील ११० सिंचन प्रकल्प मंजूर करण्यात आले. त्यातील ६९ पूर्ण झाले, पंतप्रधान कृषी सिंचन, सात प्रकल्प, त्यातून, गोसीखुर्द प्रकल्प पुढील वर्षी पूर्ण होईल असं त्यांनी सांगितलं. मराठवाड्यासाठी कृष्णा खोऱ्यातून पाणी उचलून आणण्यासाठी, सातत्यानं पैसे उपलब्ध करून दिला आहे. अमरावतीत टेक्सटाइल पार्कमध्ये आता केंद्राकडून दहा हजार कोटींची नवीन गुंतवणूक येत असून, त्यातून दोन लाख नवीन रोजगार मिळणार आहे असं मुख्यमंत्री म्हणाले. दरम्यान, विदर्भातील प्रश्न विरोधकांनी सभागृहात न मांडता विधिमंडळाच्या पायऱ्यावर आणि प्रसारमाध्यमांना आंदोलन करून, हे प्रश्न मांडण्यात धन्यता मानली असं,

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, विधिमंडळाचे कामकाज संपल्यानंतर घेतलेल्या, पत्रकार परिषदेत सांगितलं.

*विदर्भातल्या अनेक प्रकल्पना देखील आम्ही न्याय दिलेलाच आहे यापूर्वी आणि यापुढेही देणार. २० हजार रुपये धानाला बोनस देण्याचा निर्णय देखील मुख्यमंत्री महोदयाने घेतला. याचा देखील समाधान आम्हाला आहे. आणि आमच सरकार जे आहे सर्वसामान्यांच सरकार आहे सर्वांना सोबत घेऊन जाणारा. महाराष्ट्र आता न थांबता पुढे जाणार विरोधकांची संख्या जरी  कमी असली  तरीसुद्धा आम्ही त्यांचा या अधिवेशनाच्या माध्यमातून त्यांनी प्रश्न उपस्थित केले त्याला सरकारने उत्तर दिले.*

या पत्रकार परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या संबोधित करत आहेत. दरम्यान, पुढील अधिवेशन हे ३ मार्च पासून मुंबईत होणार आहे.

-----------------------------------------------

विधान परिषद कामकाज

कारागृहांच्या आधुनिकीकरणाचे काम सरकारने हाती घेतले असून येरवडा, ठाणे, नवी मुंबई येथील कारागृहाच्या आधुनिकीकरणाचे काम हाती घेण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली. तुरुंग सेवेत बदल घडविण्यासाठी विधान सभेने संमत केलेले महाराष्ट्र कारागृहे सुधार सेवा विधेयक, २०२४ हे विधेयक विधान परिषदेत आज एकमताने संमत झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत महाराष्ट्र कारागृह आणि सुधार सेवा विधेयक २०२४ सादर केलं. विधानसभेत हे विधेयक याआधीच मंजूर झालं आहे. हे विधेयक अंमलात आल्यानंतर राज्यातल्या कारागृहांचे नियम आणि कामकाजाच्या पद्धतीत मोठे बदल होणार आहेत. या विधेयकात कैद्यांची सुरक्षा, कामकाजाची पद्धत, तुरुंगातली व्यवस्था आणि इतर मुद्यांचा समावेश आहे. या विधेयकात कारागृह हे फक्त बंदिगृह नसून सुधार सेवा असल्याचा उल्लेख केला गेला आहे. याअंतर्गत कारागृह प्रशासनासाठी आणि कैद्यांसाठी कल्याण निधी स्थापन केला जाणार आहे. या निधीतून जामिनासाठी पैसे भरू न शकणाऱ्या कैद्यांना आर्थिक सहकार्य केलं जाणार आहे.

-----------------------------------------------

विधानसभा अंतिम आठवडा प्रस्ताव

विदर्भाच्या अपेक्षेला या अधिवेशनात काय न्याय मिळाला असा सवाल उपस्थित करत राज्यात ४२ मंत्री आहेत, पण त्यातील मुख्यमंत्री वगळता उर्वरित मंत्री अजून ही, बिन खात्याचेच आहेत अशी टीका, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे

गटनेते, भास्कर जाधव यांनी केली आहे. राज्य विधानसभेत कालपासून सुरू असलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावा वरच्या चर्चेत ते बोलत होते. विदर्भात गेल्या अकरा महिन्यात, दोन हजार ३३५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहे तर गेल्या तीन वर्षांत, सात हजार आत्महत्या झाल्यात. शेतमालाला योग्य आणि हमी भाव सरकार देत नाही. सत्ताधारी सदस्यच कृषी विमा योजनेत हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार करीत आहे ही, गंभीर परिस्थिती आहे याची उत्तरे, सरकारनं द्यावीत अशी मागणी, त्यांनी यावेळी केली. मिहान प्रकल्पात अजून मूलभूत सुविधाच नाहीत, विदर्भातील खनिज संपत्तीचा योग्य वापर होत नाही. विदर्भात किती रोजगार आला, टेक्सटाइल पार्कचे काय झालं, राज्यात किती नवी उद्योग आले, ते कुठे उभे राहिले, त्यातून किती रोजगार मिळाला, राज्यातील अनेक एम.आय.डी.सी. क्षेत्र, उद्योगांच्या प्रतीक्षेत आहेत, याची देखील उत्तरे द्या अशी ही मागणी, त्यांनी यावेळी केली.

---------------------------------------------

एकनाथ शिंदे दिक्षाभूमी भेट

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतींना वंदन करुन प्रेरणा आणि नवी उर्जा मिळते. दिक्षाभूमीला आल्यानंतर नेहमीच वेगळी अनुभूती व समाधानही मिळते, अशा भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज व्यक्त केल्या. उपमुख्यमंत्रीशिंदे यांचे दिक्षाभूमी स्मारक समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. यानंतर शिंदे यांनी बुद्ध प्रतिमा आणि बाबासाहेबांच्या अस्थिचे दर्शन घेवून अभिवादन केले. मंत्री दादा भुसे, शंभुराज देसाई, उदय सामंत, प्रताप सरनाईक, योगेश कदम, माजी खासदार जोगेंद्र कवाडे, स्मारक समितीचे राजेंद्र गवई आदी उपस्थित होते. यावेळी शिंदे म्हणाले, दिक्षाभूमी ही तप आणि आदर्शाची भूमी आहे.बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होवून देश-विदेशातील अनुयायी येथे येतात व प्रेरणा घेतात. बाबासाहेबांचा आदर्श डोळयासमोर ठेवूनच देशाचा व राज्याचा कारभार चालत आहे. बाबासाहेबांचे विचार सर्वसामान्यांना न्याय देणार व जनसेवेला बळ देणारे आहेत. राज्यशासनाच्या वतीने तालुकानिहाय संविधानभवन बांधण्यात येत आहेत. तसेच चैत्यभूमीवर जागतिक दर्जाचे स्मारक बांधण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

---------------------------------------------

बायो बिटूमेन रोड

भारतातील पहिल्या, बायो-बिटूमेन या सामग्रीवर आधारित राष्ट्रीय महामार्गाचं उद्घाटन, आज, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते, नागपुरातील मनसर राष्ट्रीय महामार्ग इथं झालं. पिकांच्या अवशेषांपासून बनवलेल्या बिटूमेनचा वापर

करून, मनसर-नागपूर बायपासवरील, एक किलोमीटर मार्गावर, हा रस्ता बनवला गेला आहे. हा, याप्रकारचा देशातील पहिला राष्ट्रीय महामार्ग आहे. भारत कृषीप्रधान देश असल्यामुळ, पिकांसोबतच, त्यांचे अवशेष देखील मोठ्या प्रमाणात शिल्लक राहतात. ते जाळल्यामुळ, पर्यावरणाचं नुकसान होतं. त्याचप्रमाणे भारत दरवर्षी मोठ्या प्रमाणावर बिटूमेन आयात करत ते टाळण्यासाठी सेंट्रल रोड रिसर्च इन्स्टिटयूट, नवी दिल्ली आणि पुण्याच्या, प्राज या बायोटेक कंपनीनं मिळून, या पिकांच्या अवशेषापासून, बायो बिटूमेन तयार केलं आहे. ज्याचा उपयोग, रस्ते बांधणीत होणार आहे. आजचा हा कार्यक्रम, शेतकरी बांधवासाठी वरदान असून, शेतकऱ्यांनी केवळ अन्नदाता नव्हे तर ऊर्जादाता, इंधनदाता देखील व्हायला पाहिजे असं, गडकरी यांनी सांगितलं. रामटेक, भंडारासारख्या, तांदुळ उत्पादक पट्ट्यात, भात शेतीनंतर उरणाऱ्या राईस स्ट्रा, परळीपासून सी.एन.जी. आणि बिटुमेन बनविण्याची क्षमता असल्याचं सांगून त्यांनी, बायो सी.एन.जी.चं महत्व, अधोरेखित केल.

*हमारे देश मे ४०० प्रोजेक्ट बायोमास टू सीएनजी के आए है. पेट्रोल के तुलना मे सीएनजी ६०% सस्ता है और दूसरी और किसानो को जो पड़ा हुआ वेस्ट मटेरियल जला रहे है **5** टनऑफ राइस स्ट्रॉ से ये १ टन सीएनजी देता है फिर १२ टन ऑफ कॉटन स्ट्रॉ इज गिविंग १ टन ऑफ बायोसीएनजी और १५ टन ऑफ नेपियर ग्रासेस गिविंग १ टन ऑफ बायो सीएनजी .अब बांबू के ऊपर भी प्रयोग हो रहा है, हमे ये कहना है की किसान ये भी तयार करेगा जैसा की गेहु, चावल, मका।*

बायो बिटुमेनपासून तयार झालेला रस्ता, हा पारंपारिक, डांबरापासून तयार झालेल्या रस्त्यापेक्षा, ४० टक्के सुरक्षित असून, डांबरात १५ टक्के बायो बिटूमेन मिसळून, नागपूर-मनसर, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पात,एक किलोमीटर लांबीची रस्ता निर्मिती करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. बांबूपासून बायो सी.एन.जी. त्याचप्रमाणे, लिग्निनची निर्मिती करून, यापासून नवे उद्योग सुरू करता येतील. या पर्यावरणपूरक रस्ते निर्मितीपासून, रस्ते निर्मितीच्या खर्चात कपात होईल, रोजगार निर्मिती होईल तसंच शेतमालाच्या ज्वलनापासून होणाऱ्या प्रदूषणाला आळा बसेल असं त्यांनी सांगितलं.

---

शरदचंद्र पवार

बीड जिल्हयात दहशतीचं वातावरण आहे. या हत्येमागे सूत्रधार कोण हे मुळात जाऊन शोधणं गरजेचं आहे. केंद्र-राज्य सरकारनं या प्रकरणाची नोंद घेतली पाहिजे.

संतोष देशमुख यांच्या मुलीच्या शिक्षणाचा खर्च उचलायला, आम्ही तयार आहोत. सूत्रधार शोधला पाहिजे असं स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख शरदचंद्र पवार यांनी व्यक्त केलं. मस्साजोग इथले सरपंच, संतोष देशमुख यांच्या हत्येला, तेरा दिवस लोटले तरी, तपास लागत नाही म्हणून आज, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा, शरदचंद्र पवार यांनी, स्वतः पीडित देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली, अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुद्धा आज सायंकाळी देशमुख परिवाराची सांत्वनापर भेट घेतली.

---------------------------------------------

हवामान

विदर्भात नागपूरसह सर्व जिल्ह्यांमध्ये, किमान तापमानातील वाढ कायम आहे. आज नागपुरात, १५.८ अंश सेल्सिअस, इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर अकोला जिल्ह्यात १४ इतक्या सर्वात किमान तापमानाची नोंद झाली. याशिवाय सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान १५ ते १७ अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आगामी काही दिवस, हवामानात विशेष बदल होणार नसून, ते कोरडं राहणार असल्याचा अंदाज, नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

---------------------------------------------